OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

# औरंगाबाद - प्रवेशद्वारांचे नगर

प्रा.राजगुरू गौतम धनाजी
सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग,
दादा पाटील महाविधालय,कर्जत,अहमदनगर(महाराष्ट्र)
मो.नं.9730254702 , E-mail- gtmrajguru@gmail.com

**Abstract-**

औरंगाबाद हे प्राचीन तसेच मध्ययुगीन इतिहासाचा वारसा जपणारे महाराष्ट्रातील एक इतिहासिक नगर आहे.मध्ययुगात स्थापित झालेल्या या नगराची भरभराट हि निजामशाही पेशवा मलिक अंबर आणि मुघल बादशहा औरंगजेब यांच्या कालखंडात झालेली दिसते.या नगराचे महत्त्व ओळखून बादशहा औरंगजेबाने या नगरला दख्खन सुभ्याचे केंद्रवर्ती ठिकाण बनविले.या नगरच्या संरक्षणात्मक दृष्टीने नागराभोवती तटबंदीची उभारणी करण्यात आली व या तटबंदीत प्रवेश करण्याकरिता प्रवेशद्वारांची निर्मिती करण्यात आली.यातील काही प्रवेशद्वारे एकमाजली काही दुमजली होती.तटबंदीच्या प्रवेशद्वारा जवळ भक्कम बुरुज होते. प्रवेशद्वारांच्या स्थापत्य शैलीवर मुघल,निजामशाही,व रोमन स्थापत्य शैलीचा प्रभाव दिसतो. प्रवेशद्वारांच्या माध्यमातून तपासणी करणे, स्वागत करणे, जकात गोळा करणे, नजर ठेवणे इ.प्रकारची कामे केली जात. मध्यकाळात औरंगाबाद या नगरला तटबंदीमुळे व प्रवेशद्वारांमुळे एका गढीचे स्वरूप प्राप्त झालेले होते. तटबंदी व प्रवेशद्वारे या स्थापत्य प्रकारच्या माध्यमातून तत्कालीन स्थापत्यशैली, लष्करी व्यवस्था, संरक्षण पध्दती इ. विषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळते.

औरंगाबाद या नगरात असणाऱ्या ५२ प्रवेशद्वारांमुळे या नगराचा उल्लेख हा प्रवेशद्वारांचे नगर असा केला जातो.

**Key words-**

औरंगाबाद नगराचा तसेच येथील तटबंदी व प्रवेशद्वारांचा ऐतिहासिक मागोवा घेणे, प्रवेशद्वारे या स्थापत्य शैलीचा अभ्यास करणे तसेच महत्वाच्या प्रवेशद्वारांचा आढावा घेणे.

CamScanner

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

**Introduction**

औरंगाबाद हे महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक वारसा लाभलेले नगर आहे; या नगराचा मध्ययुगीन भारतातील महत्त्वपूर्ण नगरांमध्ये समावेश होत होता. औरंगाबाद नगराचा विकास आणि विस्तार हा अहमदनगरचा निजामशहा मुर्तजा दुसरा याचा पेशवा मलिक अंबर व मुघल बादशहा औरंगजेबाच्या कारकिर्दीत झालेला दिसून येतो. औरंगजेब दख्खनचा सुभेदार असताना या नगरला संरक्षणाच्या दृष्टीकोनातून तटबंदी व प्रवेशद्वारे यांची बांधणी करण्यात आलेली होती; या तटबंदीतून नगरात प्रवेश करण्याकरता तब्बल ५२ प्रवेशद्वारे होती. प्रवेशद्वारांची स्थापत्य रचना हि वैशिष्ट्यपूर्ण असलेली दिसून येते.

**औरंगाबाद नगराचा ऐतिहासिक मागोवा**

औरंगाबाद या नगरला मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे; या नगराची निर्मिती हि भारतीय इतिहासाच्या मध्यकाळात झालेली आपणास दिसते. औरंगाबाद या नगराची निर्मिती 'खडकी' या लहान गावातून झाली. इ.स.१६१० ला अहमदनगर सुलतानाचा पेशवा मलिक अंबर च्या काळात खडकी या गावाची भरभराट होऊन गावाचे रुपांतर नगरात झाले. पुढे या नगरावर मुघलांचे वर्चस्व प्राप्त झाले. इ.स. १६२१ ला हे नगर बादशहा जहांगीर असताना मलिक अंबर चा मुलगा फातेह खान याने हे नगर मुघलांकडून घेऊन या नगराचे नामकरण 'फतेहनगर' असे केले. इ.स. १६३३ मध्ये औरंगजेब दख्खनचा सुभेदार झाल्यावर या नगरावर पुन्हा मुघलांचे वर्चस्व प्राप्त करून नगराचे नामकरण स्वात:च्या नावाने 'औरंगाबाद' असे केले. औरंगाबाद या नगराचे राजकीय महत्त्व ओळखूण दख्खनच्या सुभ्याचे केंद्रवर्ती स्थान म्हणून औरंगाबाद नगराची निवड केली व या नगरच्या संरक्षणाच्या दृष्टीने नगरला तटबंदी व प्रवेशद्वारे उभारली.

**तटबंदी व प्रवेशद्वारे**

संरक्षणात्मक दृष्टीने तटबंदीला अनन्यसाधारण महत्व असते. तटबंदी म्हणजे नगराची किंवा वस्तीचे संभाव्य आक्रमकांपासून संरक्षण करण्यासाठी उभारलेली भिंत होय. संरक्षणाच्या दृष्टीने तटबंदीचा वापर हा अगदी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत होत होता हे दिसून

CamScanner

येते. प्राचीन ग्रीक, चीन, भारत व मध्यपूर्वेतील नगरे शत्रूपासून बचाव करण्याकरिता तटबंद्या उभ्या करीत असत तसेच मध्ययुगीनयुरोप आणि आशियातील नगरांना देखील तटबंद्या होत्या. तटबंदीतून नगरांमध्ये प्रवेश करण्यासाठी द्वारांची निर्मिती केली जात ; तटबंदीला द्वारे हे एकापेक्षा अनेक असल्याचे दिसून येतात. या प्रवेशद्वारांतून नगरात प्रवेश करणे, नगरातून बाहेर पडणे, जकात वसूल करणे, पाळत राखणे इ. कामांसाठी प्रवेशद्वारांचा वापर होत असे.

मध्ययुगीन भारतात देखील नगरांचा शत्रूपासून बचाव करण्यासाठी व संरक्षणासाठी तटबंद्या होत्या. तटबंदीला नगरात प्रवेश करण्यासाठी प्रवेशद्वारे होती मध्ययुगीन भारतात अनेक नगरांना तटबंदी व प्रवेशद्वारे असलेली दिसून येतात. औरंगाबाद या नगर हे आपल्या वैशिष्ट्यपूर्ण तटबंदी व प्रवेशद्वारांसाठी प्रसिध्द होते. औरंगाबाद या नगरला पाच महत्वाच्या तटबंदया होत्या व त्या तटबंदयांना लहान-मोठे असे ५२ प्रवेशद्वारे होती.

**औरंगाबाद - तटबंदी व प्रवेशद्वारांचे नगर**

मध्ययुगीन भारतात संरक्षणाच्या दृष्टीने नगरांना तटबंदी केली जात होती. मध्ययुगीन भारतात तटबंदी युक्त अनेक गावे व नगरे अस्तित्वात असल्याचे तत्कालीन पुराव्यांवरून दिसून येते. औरंगाबाद या नगरातील तटबंदी व प्रवेशद्वारे हि स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने तसेच संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याचे दिसून येतात. औरंगाबाद या नगरातील अनेक प्रवेशद्वारांमुळे या नगराचा उल्लेख हा प्रवेशद्वारांचे नगर असे करतात.

**तटबंदी**

मध्ययुगीन काळात औरंगाबाद या नगरला पाच महत्वाच्या तटबंदया असल्याचे दिसून येते; त्या पुढीलप्रमाणे -

१) नवखंडा तटबंदी

२) किल्ले अर्क तटबंदी

३) मुख्य नगराभोवती असणारी तटबंदी

४) बेगमपुरा तटबंदी



CamScanner

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

५) बायजीपुरा तटबंदी

या पाच तटबंदयांपैकी फक्त पहिली तटबंदी नवखंडा तटबंदीची उभारणी हि निजामशाही पेशवा मलिक अंबर याने इ.स. १६१० साली केली होती. बाकीच्या चार तटबंदींची उभारणी हि औरंगजेब दख्खनचा सुभेदार असताना व मुघल बादशहा असताना त्याच्या काळात झालेली दिसून येते. तटबंदीची बांधणी दगडी आहे. औरंगाबादमधील प्रत्येक तटबंदीच्या दरवाजाच्या बाजूला भक्कम अष्टकोनी बुरुज आहेत; या बुरुजांवर तटबंदी आहे या तटबंदीला झरोके आहेत या झारोक्यांच्या माध्यमातून शत्रूवर नजर ठेवली जात तसेच तटबंदीवर जागोजागी चौफेर फिरवता येणाऱ्या तोफांची व्यवस्था करण्यात आलेली होती.

प्रवेशद्वारे

तटबंदीतून नगरात प्रवेश करण्यासाठी तटबंदीला प्रवेशद्वारे असत. औरंगाबाद तटबंदीतून नगरात प्रवेश करण्याकरिता अनेक प्रवेशद्वारे होती.प्रवेशद्वारांच्या स्थापत्य शैलीवर निजामशाही,मुघल तसेच रोमन स्थापत्य शैलीचा प्रभाव असलेला दिसतो. औरंगाबाद हे वैशिष्ट्यपूर्ण अशा प्रवेशद्वारांसाठी प्रसिध्द आहे. या नगरातील तटबंदीला एकूण ५२ प्रवेशद्वारे होती त्यातील भडकल दरवाजा सोडून बाकी ५१ प्रवेशद्वारांची निर्मिती हि औरंगजेब कालखंडात झालेली दिसते. या ५२ प्रवेशद्वारांपैकी १९ प्रवेशद्वारे सध्याच्या स्थितीला उभे असून ती नगरच्या चौफेर असलेले दिसून येतात. औरंगाबाद नगरातील काही महत्वाचे प्रवेशद्वारे पुढीलप्रमाणे, दिल्ली प्रवेशद्वार, भडकल प्रवेशद्वार, मक्का प्रवेशद्वार, रोशन प्रवेशद्वार, खास/ जालना प्रवेशद्वार, खुनी दरवाजा, काला दरवाजा, रंगीन दरवाजा, बेगम दरवाजा, कटकट प्रवेशद्वार, जफर प्रवेशद्वार, नौबत प्रवेशद्वार, महमद प्रवेशद्वार, छोटा भडकल दरवाजा, खिज़्र दरवाजा,मीर आदिल प्रवेशद्वार,किल्ले अर्क प्रवेशद्वार इ. काही महत्त्वाच्या पवेशद्वारांची माहिती पुढीलप्रमाणे
,

1. **दिल्ली प्रवेशद्वार** - दिल्ली प्रवेशद्वार हे नगरातील सर्वात भव्य असे प्रवेशद्वार आहे. औरंगजेब दख्खनचा सुभेदार असताना त्याने १६५७ साली हे प्रवेशद्वार बांधले. औरंगजेबाने हिंदुस्थानचा बादशहा बनण्याच्या इर्षीने दिल्लीचे तख्त काबीज करण्यासाठी तत्कालीन बादशहा शहाजहान विरुध्द बंड करून याच प्रवेशद्वारे इस. १६५८ ला दिल्लीवर



CamScanner

चाल केली. त्यामुळे या प्रवेशद्वाराला दिल्ली प्रवेशद्वार असे नाव पडले. दिल्ली प्रवेशद्वारावर दिल्लीच्या लाल किल्ल्याच्या लाहोर प्रवेशद्वाराचा प्रभाव दिसतो.

2. **भडकल प्रवेशद्वार** - भडकल प्रवेशद्वार हे नगरातील सर्वात पुरातन प्रवेशद्वार असून हे दुमजली आहे. या प्रवेशद्वाराची उभारणी निजामशाही पेशवा मलिक अंबर याने १६१२ साली मिळालेल्या मोघालांशी लढाईतील विजया प्रीत्यर्थ या द्वाराची उभारणी केली असून या प्रवेशद्वारावर रोमन स्थापत शैलीचा प्रभाव दिसतो.

3. **मक्का प्रवेशद्वार** - मक्का प्रवेशद्वार हे औरंगाबाद नगरच्या पश्चिमेस आहे. इस्लामचे पवित्र धार्मिक स्थळ मक्का हे पश्चिम दिशेला असल्यामुळे या प्रवेशद्वाराला मक्का प्रवेशद्वार असे म्हणतात.

4. **रोशन प्रवेशद्वार** - रोशन दरवाजा नगरच्या पूर्वेस आहे. पूर्वेकडून सूर्याची किरणे प्रथम या दरवाजावर पडत असल्यामुळे या दरवाजाला रोशन दरवाजा हे नाव पडले असून तसेच औरंगजेबाने बहिण रोशन आरावर असणाऱ्या विश्वासामुळे या द्वाराला नाव दिले गेले असे म्हणतात.

5. **जालना दरवाजा** - या दरवाज्याच्या दिशेला जालना शहर आहे त्यामुळे या दरवाजाला जालना दरवाजा म्हणतात. या दरवाजाची बांधणी हे साध्या पद्धतीची आहे.

6. **खुनी दरवाजा** - औरंगाबाद मधील रशीदपुर येथे हा दरवाजा असून येथे अनेक लढाया झाल्यामुळे या ठिकाणी अनेकांचे बळी गेल्यामुळे या दरवाज्यास खुनी दरवाजा म्हणतात. आज हा दरवाजा इक्बाल दरवाजा या नावाने प्रचलित आहे.

7. **काला दरवाजा** - औरंगजेबाने हा दरवाजा किल्ले अर्क तटबंदीत १६५९ साली बांधला या तटबंदीतील हा महत्त्वाचा दरवाजा आहे. या दरवाज्याच्या वर दोन्ही बाजूंना कमळाच्या फुलांची रचना दिसावी असे मिनार आहेत.

एकंदरीतच औरंगाबाद मधील प्रवेशद्वारे यातून तत्कालीन स्थापत्य शैलीचा कलाविष्कार दिसून येतो. यातील काही प्रवेशद्वारे हि एकमजली आहेत तर काही दुमजली आहेत ; हि प्रवेशद्वारे दगड,माती, लाकूड व लोह या पसून उभारलेली आहेत.

**समारोप** -

औरंगाबाद हे प्राचीन तसेच मध्ययुगीन इतिहासाचा वारसा जपणारे महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण नगर आहे. या नगराचे राजकीयदृष्ट्या महत्त्व पाहून या नगरला औरंगजेबाने दखखन सुभ्याचे केंद्रवर्ती ठिकाण बनविले तसेच नगरच्या संरक्षणाकरिता नगराभोवती मजबूत तटबंदीची उभारणी केली होती तसेच या तटबंदीतून जाण्यायेण्याकरिता प्रवेशद्वारांची निर्मिती करण्यात आलेली होती. नगरातील प्रवेशद्वारतून तपासणी,स्वागत,टेहळणी,जकात गोळा करणे इ. प्रकारची महत्त्वाची कामे केले जात होते. औरंगाबादच्या या तटबंदीमुळे व प्रवेशद्वारांमुळे औरंगाबाद या नगरला मध्ययुगीन भारतात एका गढीचे स्वरूप प्राप्त झालेले होते. या प्रवेशद्वारे व तंटबंदीच्या अभ्यासातून आपणास तत्कालीन स्थापत्य शैली, संरक्षण पदधती, लष्करी इतिहास इ. विषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळते.

**संदर्भ -**

1. कुलकर्णी गो.त्र्यं.(संपा.),*मध्ययुगीन भारताचा इतिहास*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई,२००१.
2. कुंटे भ.ग.(अनु.), *गुलशन इब्राहिमी* (मूळ लेखक - फेरिस्त),महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई,१९८२.
3. पटेल जी,एच., कामठे जयवंत, *ऐतिहासिक औरंगाबाद तटबंदी आणि दरवाजे*, चिन्मय. प्रकाशन,औरंगाबाद,२०१५.
4. सरकार जदुनाथ, *औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास*,श्री मंगेश प्रकाशन,नागपूर,१९९९.
5. सरदेसाई गो.स., *मुसलमानी रियासत(भाग-२)*. पोपुलर प्रकाशन,मुंबई,२००३.
6. Banerjee Rajiv, *History Revisited at Aurangabad the city of gates*, The Economik times ,2009



CamScanner